# विभागीय आयुक्तांसह पोलीस आयुक्तांची विजयस्तंभाला भेट

**१ जानेवारी २०२५ रोजी होणाऱ्या २०७ व्या अभिवादन दिनाची प्रशासनाकडून तयारी पूर्ण**

**पुणे / प्रतिनिधी**

कोरेगाव भीमा सह पेरणे येथे १ जानेवारी २०२५ रोजी होणाऱ्या २०७ व्या अभिवादन दिनाची प्रशासनाकडून तयारी पूर्ण होत असताना विभागीय आयुक्त डॉ. चंद्रकांत पुलकुंडवार व पोलीस आयुक्त अमितेश कुमार यांनी विजयस्तंभाला भेट देत तयारीची पाहणी केली आहे.

कोरेगाव भीमा विजयस्तंभ येथे १ जानेवारी २०२५ रोजी २०७ वा शौर्यदिन साजरा होत असताना येथे प्रशासनाकडून तयारी सुरु असताना पुणे विभागीय आयुक्त डॉ. चंद्रकांत पुलकुंडवार व पोलीस आयुक्त अमितेश कुमार यांनी भेट देत विजयस्तंभ अभिवादन कार्यक्रमाच्या अनुषंगाने सुरू असलेल्या तयारीची पाहणी केली. यावेळी पोलीस सहआयुक्त रंजन कुमार शर्मा, अतिरिक्त पोलीस आयुक्त मनोज पाटील, पोलीस उपायुक्त डॉ. राजकुमार शिंदे, उपविभागीय अधिकारी यशवंत माने, कोरेगाव भीमा विजयस्तंभ सेवा संघाचे अध्यक्ष सर्जेराव वाघमारे, भीमा कोरेगाव विजयस्तंभ शौर्यदिन समन्वय समितीचे अध्यक्ष राहुल डंबाळे यांसह आदी उपस्थित होते. दरम्यान विभागीय आयुक्त डॉ. चंद्रकांत पुलकुंडवार व पोलीस आयुक्त अमितेश कुमार यांनी विजयस्तंभाचे सुशोभीकरण, गर्दी व्यवस्थापन, रांगा व्यवस्थापनाचे केलेले नियोजन, आजूबाजूच्या जागेचे सपाटीकरण तसेच परिसरात उभारण्यात येत असलेली शौचालये, पेंडाल, पोलीस सूचना मनोरे यांसह आदी तयारीची व सोयी सुविधांची पाहणी करून संबंधित विभागांना सूचना देत विजयस्तंभ परिसरात उपस्थित विविध संघटनांच्या प्रतिनिधींशी संवाद साधून त्यांच्या सूचना जाणून घेतल्या आहे.




## विजयस्तंभाच्या आकर्षक सजावटीस सुरुवात

**कोरेगाव भीमा ता. शिरुर सह पेरणे फाटा येथे एक जानेवारी रोजी होणाऱ्या २०७ व्या शौर्यदिनाच्या कार्यक्रमासाठी विजयस्तंभास प्रथमच आगळीवेगळी फुलांची आकर्षक सजावट करण्यात येणार असताना विजयस्तंभाच्या आकर्षक सजावटीस नुकतीच सुरुवात करण्यात आली आहे.**

**कोरेगाव भीमा ता. शिरुर सह पेरणे फाटा येथे एक जानेवारी या शौर्यदिनी होणाऱ्या विजयस्तंभ अभिवादन कार्यक्रमाच्या तयारी साठी प्रशासनाने चांगली काळजी घेतलेली असताना येथील तब्बल पंच्याहत्तर फुटी असलेला ऐतिहासिक जयस्तंभ जिल्हाधिकारी सिहास दिवसे यांच्या अध्यक्षतेखाली असलेल्या समितीच्या माध्यमातून काही संघांच्या देखरेखीखाली सजावट करण्यास सुरुवात आलेली असताना, अग्निशामक बंबांच्या सहाय्याने स्तंभ पाण्याने धुवून घेत स्तंभाला आकर्षक फुलांची सजावट करण्याची सुरुवात करण्यात आलेली आहे,**

## थोडक्यात

### अलंकापुरी इंद्रायणी नदी फेसाळली

**आळंदी** : पिंपरी चिंचवड महानगरपालिका हद्दीतून इंद्रायणी नदीत थेट मैला मिश्रित सांडपाणी आणि उद्योगाचे केमिकल रसायन मिश्रित दूषित पाणी थेट इंद्रायणी नदीत येत असल्याने तीर्थक्षेत्र आळंदीत इंद्रायणी नदी पुन्हा फेसळली असून नदी प्रदूषण वाढल्याने आळंदीत भाविक, नागरिकांतून नाराजी व्यक्त होत आहे. नदी प्रदूषण रोखण्यासाठी उपाय योजना आवश्यक असल्याने नदी प्रदूषण मुक्त व्हावी अशी मागणी आळंदीतून जोर धरत आहे. आळंदीतील कीर्तनकार चिदंबरेश्वर साखरे, तुकाराम महाराज ताजने, विश्वकर्मा महाराज पांचाळ, पुयड महाराज, दिलीप महाराज ठाकरे, कृष्णाजी डहाके आदीसह नागरिक भविकांतून नाराजी व्यक्त होत असून त्यांनी इंद्रायणी प्रदूषण मुक्त व्हावी अशी मागणी केली आहे.

### दोन दुचाकींची समोरासमोर धडक

**चिंचवड** : चिंचवड मधील वाल्हेकरवाडी रोडवर दोन दुचाकींची समोरासमोर धडक झाली. यामध्ये एका दुचाकीवरील तरुण गंभीर जखमी झाला.

चंद्रकांत विश्वनाथ माने (वय २६, रा. देहूरोड) असे जखमी तरुणाचे नाव आहे. त्यांनी याप्रकरणी चिंचवड पोलीस ठाण्यात फिर्याद दिली आहे. त्यानुसार दुचाकी (एमएच २४/बीयु ३००१) चालकाच्या विरोधात गुन्हा दाखल करण्यात आला आहे.

पोलिसांनी दिलेल्या माहितीनुसार, फिर्यादी माने हे त्यांच्या दुचाकीवरून वाल्हेकरवाडी रोडने देहूरोड येथे घरी जात होते. रसिकलाल धारिवाल शाळेजवळ आल्यानंतर त्यांच्या दुचाकीला विरुद्ध दिशेने समोरून आलेल्या भरधाव दुचाकीने धडक दिली. या अपघातात माने यांच्या पायाला गंभीर दुखापत झाली आहे. चिंचवड पोलीस तपास करीत आहेत.

## दारुच्या नशेत रॉंगसाईडने रिक्षा चालवल्याने झालेल्या अपघातात रिक्षा प्रवाशाचा मृत्यु

**पुणे / प्रतिनिधी**

**दारुच्या नशेत रॉंग साईडने रिक्षा चालवून कॅबला धडक दिल्यानंतर रिक्षा उलटल्याने झालेल्या अपघातात रिक्षा प्रवाशाचा मृत्यु झाला.**

दारुच्या नशेत रॉंग साईडने रिक्षा चालवून कॅबला धडक दिल्यानंतर रिक्षा उलटल्याने झालेल्या अपघातात रिक्षा प्रवाशाचा मृत्यु झाला.

धरमवीर राधेशाम सिंग (वय ३८, रा. श्रीनगर, वडगाव शेरी) असे मृत्यु पावलेल्या रिक्षा प्रवाशाचे नाव आहे. याबबात कॅबचालक पराग सुनिल शर्मा (वय २८, रा. हॅप्पी इस्टेट, चंदननगर) यांनी येरवडा पोलीस ठाण्यात फिर्याद दिली आहे. त्यावरुन पोलिसांनी जॉन राजू स्वामी (वय ३१, रा. मुळीक कॉम्प्लेक्स, वडगाव शेरी) याच्यावर गुन्हा दाखल केला आहे. हा प्रकार नगर -पुणे रोडवर आगाखान पॅलेस समोर रविवारी पहाटे पावणे दोन वाजण्याच्या सुमारास घडला.

याबाबत पोलिसांनी सांगितले की, जॉन स्वामी याने दारु पिऊन त्याच्या नशेत प्रवाशांना घेऊन वडगाव शेरीहून आला होता. रॉंग साईडने भरधाव रिक्षा चालवली. रस्त्याच्या कडेला उभ्या असलेल्या कॅबच्या डाव्या बाजूस धडक दिली. त्यानंतर रिक्षा ही कॅबच्या मागे जाऊन पलटी झाली. त्यामुळे फिर्यादीच्या गाडीचे समोरील डाव्या बाजूचे बंप्पर, हेडलाईट चेंबून तुटून नुकसान झाले. त्याचवेळी रिक्षा पलटी झाल्याने आतील प्रवासी धरमवीर राधेशाम सिंग यांचा मृत्यु झाला. सहायक पोलीस निरीक्षक लमखेडे तपास करीत आहेत.

## सोमवती अमावस्यानिमित्त श्री क्षेत्र वीर येथे भाविकांची दर्शनासाठी गर्दी

**पुणे / प्रतिनिधी**

लाखो भाविकांचे श्रद्धास्थान असणाऱ्या काशीखंडाच्या काळभैरवाचे अवतार श्रीनाथ म्हस्कोबा व आई जोगेश्वरी, श्रीक्षेत्र वीर देवस्थान येथे सोमवती अमावस्येनिमित्त भाविकांची अलोट गर्दी पहावयास मिळाली.

पहाटे ४ वाजता पूजा होऊन मुख्य गाभारा बंद करण्यात आला. भाविकांची गर्दी पाहता व पहाटे ४ वाजेपासूनच देऊळवाडा दर्शनासाठी खुला करण्याचा निर्णय मंदिर प्रशासने घेतला. त्यामुळे पहाटे येणाऱ्या भाविकांना मंदिरात प्रवेश करून दर्शन घेता आले. त्यानंतर सकाळी ६ वाजता मुख्य गाभाराही दर्शनासाठी खुला करण्यात आला. सकाळपासूनच देवस्थान ट्रस्ट व भाविकांतर्फे देवाला अभिषेक करण्यात आले. सकाळी दहा वाजता देवाला भाविकांच्या दहीभाताच्या पूजा बांधण्यात आल्या. देऊळवाड्यात दगडी कासवावर सालकरी गोसावी मंडळींचा पारंपारिक गोंधळाचा कार्यक्रम दिवसभर सुरू होता. दुपारी ११.३० वाजता धुप आरती होऊन श्रीनाथांची पालखी सर्व लवाजम्यासहित निरा स्नानासाठी श्रीक्षेत्र घोडेउड्डाण येथे निघाली. यासंबंधी पूर्व नियोजन संपूर्ण विश्वस्त मंडळांनी केल्याचे देवस्थान ट्रस्टचे अध्यक्ष राजेंद्र धुमाळ यांनी सांगितले.

मंदिरात दिवसभर आजचे महाप्रसादाचे आयोजन सदाबापू धोंडीबा सातव, बारामती व कै. शंकरराव वामनराव धुमाळ यांच्या स्मरणार्थ करण्यात आले होते. देवस्थान ट्रस्टमार्फत भाविकांसाठी पिण्याचे स्वच्छ पाणी, लाईट व जनरेटर, दर्शनबारी, वाहनतळ व्यवस्था, परिसर स्वच्छता, ज्यादा कर्मचारी स्वयंसेवक, ट्रॅफिक पोलीस यांचे आयोजन करण्यात आले होते.

देवस्थान ट्रस्ट मार्फत आज श्रीनाथ म्हस्कोबा दिनदर्शिका लोकार्पण सोहळा आयोजित करण्यात आला होता. भाविकांना मोफत दिनदर्शिकेचे वाटप करण्यात आले. सर्व सालकरी, मानकरी,विश्वस्त, सल्लागार मंडळ, ग्रामस्थ भाविक आदीजन यावेळी उपस्थित होते .

## डॉ. बाबासाहेबांच्या मानवंदनेच्या शताब्दीची तयारी सुरु !

**शिक्रापूर / प्रतिनिधी**

कोरेगाव भीमा ता. शिरुर येथे १ जानेवारी रोजी होणारा विजयस्तंभ शौर्यदिन अभिवादन सोहळा अतिशय उत्साहात तसेच शासनाच्या सहयोगाने सुरक्षित व सुविधायुक्त वातावरणात पार पाडणार असल्याने अनुयायांनी अभिवादनासाठी जास्तीत जास्त संख्येने उपस्थित रहावे असे आवाहन भीमा कोरेगाव विजयस्तंभ शौर्यदिन समन्वय समितीचे अध्यक्ष राहुल डंबाळे व सल्लागार डॉ. सिद्धार्थ धेंडे यांनी केले आहे.

कोरेगाव भीमा ता. शिरुर येथील विजयस्तंभ अभिवादन कार्यक्रम शांतता व उत्साहात तसेच सुविधायुक्त पार पाडण्यासाठी उपमुख्यमंत्री अजितदादा पवार, सामाजिक न्याय मंत्री संजय शिरसाठ, राज्याच्या मुख्य सचिव सुजाता सौनिक व पोलीस महासंचालक रश्मी शुक्ला यांनी विशेष लक्ष घालून समाजबांधवांना सुविधा व सुरक्षा देण्याचे प्रयत्न केले असताना जिल्हाधिकारी यांच्या अध्यक्षतेखालील प्रशासकीय समितीच्या माध्यमातून समन्वय समितीने केलेल्या सुचनेनुसार पार्किंग, शौचालय, आराम कक्ष, पिण्याचे पाणी, वैद्यकीय सहायता आदी सुविधा वाढवलेल्या आहे. अभिवादन कार्यक्रमास वीस लाख पेक्षा जास्त अनुयायी येण्याचा अंदाज वर्तवला जात आहे, पुणे पोलिस आयुक्त अमितेश कुमार, सहआयुक्त रंजनकुमार, पोलिस अधिक्षक पंकज देशमुख यांनी बैठका घेत उत्सव शांततेत पार पडेल असा विश्वास निर्माण केलेला आहे. अनुयायांनी कोणताही गैरसमज मनात न ठेवता मोठया उत्सहाने अभिवादनासाठी यावे, अनुयायांचे स्वागत करण्यासाठी ग्रामस्थ प्रयत्न करीत असल्याचे पेरणेच्या सरपंच उषा वाळके व कोरेगाव भीमाचे सरपंच संदिप ढेरंगे, समन्वयक साईराज वाळके यांनी सांगितले, विजयस्तंभ येथे वंचित बहुजन आघाडीचे नेते ड. बाळासाहेब आंबेडकर, केंद्रीय मंत्री रामदास आठवले यांनी अभिवादन केल्यानंतर रिपब्लिकन सेनेचे आनंदराज आंबेडकर, भारतीय बौद्ध महासभेचे भीमराव आंबेडकर, भारत मुक्ती मोर्चाचे वामन मेश्राम, दलित कोब्राचे भाई विवेक चव्हाण, पिपल्स रिपब्लिकन पक्षाचे जोगेंद्र कवाडे, भिमआर्मीचे चंद्रशेखर आझाद, राष्ट्रवादीचे नेते जितेंद्र आव्हाड, कॉंग्रेस नेते नितीन राऊत, शिवसेना उपनेत्या सुषमा अंधारे, एम आय एमचे माजी खासदार इम्तियाज जलील, रिपब्लिकन नेत्या सुवर्णा डंबाळे यांची संयुक्त सभा रिपब्लिकन युवा मोर्चा कडून आयोजित करण्यात आल्याचे सांगत येथे सकारात्मक वातावरण असल्यामुळे नागरीकांनी कोणतीही शंका न करता अभिवादनाला यावे असे आवाहन देखील भीमा कोरेगाव विजयस्तंभ शौर्यदिन समन्वय समितीचे अध्यक्ष राहुल डंबाळे व सल्लागार डॉ. सिद्धार्थ धेंडे यांनी केले आहे.

## भोंदूबाबाने महिलेवर चाकुच्या धाकाने केला बलात्कार

**पुणे** : दैवीशक्ती प्राप्त झाल्याची बतावणी करुन एका भोंदूने महिलेवर चाकुच्या धाकाने बलात्कार केल्याची घटना उघडकीस आली आहे. याप्रकरणी बिबवेवाडी पोलिसांनी भोंदूविरुद्ध गुन्हा दाखल केला आहे. याबाबत एका महिलेने बिबवेवाडी पोलीस ठाण्यात फिर्याद दिली आहे. तिने दिलेल्या फिर्यादीनुसार, आरोपीविरुद्ध बलात्कार, तसेच जिवे मारण्याची धमकी दिल्याप्रकरणी गुन्हा दाखल करण्यात आला आहे. पोलिसांनी दिलेल्या माहितीनुसार, आरोपी आणि महिलेची ओळख होती. दैवीशक्ती अवगत आहे, तसेच माझ्या अंगात संचार होतो, असे सांगून भोंदूने महिलेला जाळ्यात ओढले. त्यानंतर आरोपी महिलेच्या घरी आला. महिला आणि तिची दोन मुले घरात होते. भोंदूने महिलेला चाकूचा धाक दाखवून तिच्यावर बलात्कार केल्याची घटना नुकतीच घडली.

# १ कोटी २० लाखांचा मद्याचा साठा राज्य उत्पादन शुल्क विभागाकडून जप्त

**वीटभट्टीसाठी लागणाऱ्या कोळशाच्या पावडरच्या आडून व फ्रुट पल्पच पॅकिंगमधून तस्करी**

**पुणे / प्रतिनिधी**

**नववर्षाच्या स्वागत करताना दारुचा खप मोठा होत असल्याने त्यात बनावट मद्याचा मोठ्या प्रमाणावर वापर होतो. तसेच गोवा राज्यातील मद्याचा वापर येथील हॉटेलमध्ये केला जातो. गोवा बनावटीचे मद्यावर राज्य उत्पादन शुल्क विभागाने वेगवेगळ्या ठिकाणी केलेल्या कारवाईत तब्बल १ कोटी २० लाख ३२ हजार रुपयांचा माल जप्त केला आहे.**



नववर्षाच्या स्वागत करताना दारुचा खप मोठा होत असल्याने त्यात बनावट मद्याचा मोठ्या प्रमाणावर वापर होतो. तसेच गोवा राज्यातील मद्याचा वापर येथील हॉटेलमध्ये केला जातो. गोवा बनावटीचे मद्यावर राज्य उत्पादन शुल्क विभागाने वेगवेगळ्या ठिकाणी केलेल्या कारवाईत तब्बल १ कोटी २० लाख ३२ हजार रुपयांचा माल जप्त केला आहे. ९ आरोपींना अटक करुन विदेशी मद्याच्या १६६८ बाटल्या व ५ वाहने जप्त केली आहेत.

संशयित वाहनांची तपासणी करत असताना गोवा बनावटी मद्याचे ३ बॉक्स राज्य उत्पादन शुल्क विभागाच्या सासवड पथकाला मिळाले. त्याच्याकडे चौकशीतून नसरापूर येथील एका पत्र्याचे शेडमध्ये छापा टाकला असता तेथे एक जण अशोक लेलंड ट्रकमधून गोवा बनावटी मद्याचे बॉक्स गाडीतून उतरुन गोडावून मध्ये ठेवल होता. त्याला ताब्यात घेऊन शेडची तपासणी केली असता ट्रकमध्ये वीटभट्टीसाठी लागणार्या कोळशाची पावडर व गोवा बनावटीचे विविध ब्रांडच्या विदेशी मद्याचे बॉक्स तसेच पत्रा शेडमध्ये थर्माकोलच्या बॉक्समध्ये गोवा बनावटी मद्य मिळून आले. हे मद्य थर्माकोलच्या बॉक्समध्ये पॅकिंग करुन फ्रुट पल्पच्या नावाखाली गुजरात व इतरत्र पाठविण्यासाठी पॅकिंग केलेल्या जात असल्याचे आढळून आले. या ठिकाणाहून अशोक लेलंड सहा चाकी ट्रक, गोवा बनावटीच्या विदेशी मद्याच्या १७१० बाटल्या व इतर एका एकूण५१ लाख ९५ हजार १७० रुपयांचा माल जप्त करुन चौघांना अटक केली आहे.

या कारवाईत निरीक्षक एस एस बरगे, दुय्यम निरीक्षक पी एम मोहिते, एस सी शिंदे, तसेच संदिप मांडवेकर, जवान सुनील कुदळे, दत्रात्रय पिलावरे, अंकुश कांबळे, ऋतिक कोळपे, बाळू आढाव यांनी भाग घेतला.

दुसरी कारवाई निगडी येथील पवळे पुलाखाली भक्ती शक्ती चौक येथे करण्यात आली. गोवा राज्यात विक्रीकरता असलेले विदेशी मद्य व बिअर असा एकूण १ लाख ३४ हजार २३० रुपयांचा मद्यसाठी एका लक्ष्मी क्वीन ट्रव्हल कंपनीच्या खासगी बसमधून आणला जात होता. बसचालकाला ताब्यात घेऊन हा साठा जप्त करण्यात आला.

एल&टी फायनान्स लिमिटेड
(आधीचे नाव, एल&टी फायनान्स होल्डिंग्ज लिमिटेड)
**नोंदणीकृत कार्यालय:** एल&टी फायनान्स लिमिटेड, बृंदावन बिल्डिंग, प्लॉट नं. 177 कलिना, सीएसटी रोड, मर्सिडीज शोरुम जवळ, सांताक्रूझ (पू), मुंबई 400 098
**CIN No.:** L67120MH2008PLC181833
**शाखा कार्यालय:** पुणे

L&T Finance

## तारण ठेवलेल्या मालमत्तेच्या विक्रीसाठी जाहीर लिलाव

एल&टी फायनान्स लिमिटेडचे अधिकृत अधिकारी वित्तीय मालमत्ता पुनर्रजना आणि अनामत व्याजाची सक्तवसुली कायदा, 2002 [54 चा 2002] अंतर्गत आणि सदर कायद्यांतर्गत प्रदत्त अधिकारांचा वापर करून आपली थकबाकी आणि पुढील व्याज, आकार आणि खर्च इ.च्या वसुलीसाठी **''सार्वजनिक ई-लिलावाद्वारे'' ''जिथे आहे जसे आहे तत्वावर''** आणि **''ज्या स्थितीत आहे त्या स्थितीत तत्वावर''** खालील मालमत्तेचा ई-लिलाव करीत आहेत.

| कर्जदार आणि सह-कर्जदाराचं नाव | तारण ठेवलेल्या मालमत्तेचा पत्ता | कर्ज खाते क्रमांक (एक/अनेक) | भौतिक ताबा घेतला | बयाणा रक्कम आरपीच्या 10% किंवा जास्त (रुपयांमध्ये) | एकूण शिल्लक थकबाकी 14.10.2024 नुसार | आरक्षित किंमत (रुपयांमध्ये) | आरंभाची तारीख | लिलावाची तारीख आणि वेळ |
|---|---|---|---|---|---|---|---|---|
| 1. शशांक रमेश मुळ्ये 2. कांचन विलास कासार 3. ओमॅक्स इंडस्ट्रीज (त्याचे मालक शशांक रमेश मुळ्ये यांच्या द्वारे) | मालमत्तेचा सर्व तुकडा आणि पार्सल पत्ता: 12 व्या मजल्यावरील फ्लॅट क्र. 1201 805 चौ.फूट चटई क्षेत्रासह 139 चौ.फूट टेरेस क्षेत्र विंग क्र. सी आणि इमारत क्र. 5 मध्ये एक कार पार्किंगची जागा, फेज-2, कल्पतरू इस्टेटमध्ये, इमारत क्रमांक 5 आणि 6 सहकारी गृहनिर्माण संस्था लि., मालमत्ता बेअरिंग सर्व्हे क्रमांक 85 वर बांधलेली, हिसा क्रमांक 1a/1 (भाग) आणि संबंधित सीटीएस क्रमांक 2009 (p) आणि 2057 (p), सर्वेक्षण क्रमांक 85/1b/2/1 आणि संबंधित 2057(p), सर्वेक्षण क्रमांक 86 हिसा क्रमांक 2b/1(p) आणि संबंधित सीटीएस क्रमांक 2009 (p) आणि 2057 (p) सर्वेक्षण क्रमांक 90 हिसा क्रमांक 2/1 आणि संबंधित सीटीएस क्रमांक 2009 (p) आणि सर्वेक्षण क्रमांक 91/1a आणि संबंधित सीटीएस क्रमांक 2009 (p) पिंपळे गुरव, तालुका-हवेली, पुणे महाराष्ट्र पुणे भारत 411061 येथे स्थित आहे. | PUNHL18001392 & PUNHL18001417 | 15 मार्च 2024 | रु. 7,64,040 | रु. 80,67,556.26/- | रु. 76,40,400 | सर्व कामकाजाच्या दिवशी सकाळी 10.00 ते संध्याकाळी 5.30 या वेळेत पूर्व भेटीसह. | 21.01.2025 दुपारी ते 12.00 ते 2.00 |

### सार्वजनिक लिलावाच्या अटी आणि नियम

1. अधिकृत अधिकाऱ्यांकडून सरफेसी कायद्या अंतर्गत https://sarfaesi.auctiontiger.net/EPROC/ वेबसाइटवरून मदतीसह आणि जाहीर ई-लिलाव पध्दतीने, ऑनलाइन ई-लिलाव विक्री केली जात आहे.
2. हा जाहीर ई-लिलाव वर उल्लेखित दिनांक आणि वेळेस केला जाईल, जेव्हा वर उल्लेखित ताब्यात घेतलेली मालमत्ता **''जशी आहे जिथे आहे तत्वावर''** आणि **''जशी आहे ज्या स्थितीत आहे''** त्या तत्वावर विकली जाईल.
3. सदर जाहीर ई-लिलावत सहभागी होण्यासाठी, इच्छुक खरेदीदार/बोली लावणाऱ्यांना **20/01/2025** रोजी किंवा त्यापूर्वी पॅनकार्ड, कंपनीच्या बाबतीत मंडळाचे ठराव आणि पत्त्याचा पुराव्यांच्यासोबत ताब्यातील मालमत्तेच्या आरक्षित किंमतीच्या 10% परतावायोग्य अनामत रक्कम ठेव भरल्याचा तपशील सादर करावा लागेल.
4. या जाहीर ई-लिलावत यशस्वी न झालेल्या सर्व अन्य बोली लावणाऱ्यांचे ईएमडी LTF द्वारे सदर जाहीर ई-लिलावच्या समाप्तीनंतर 7 दिवसांच्या आत परत केले जाईल. या ईएमडी वर कोणतेही व्याज दिले जाणार नाही.
5. यशस्वी खरेदीदार/बोलीदाराने, त्याच्या/तिच्या प्रस्तावापैकी 25% रक्कम (बयाणा रकमेसह) मुंबई येथे देय होणाऱ्या डी.डी./पी.ओ.च्या स्वरूपात एल&टी फायनान्स लिमिटेड च्या नावे लिलावाच्या तारखेला म्हणजे **21/01/2025** रोजी 18:00 पर्यंत किंवा आधी अथवा कामकाजाच्या पुढील दिवशी म्हणजे **22/01/2025** भरावी, ह्या जमा रकमेची खात्री एल&टी फायनान्स लिमिटेडकडून दिली जाईल, जर तसं झालं नाही तर विक्री पूर्ण झाली नाही असे मानले जाईल आणि सदर बोलीदाराची बयाणा रक्कम जप्त केली जाईल. शिल्लक रक्कम म्हणजे खरेदी किंमतीच्या 75% रक्कम खरेदीदाराकडून एल&टी फायनान्स लिमिटेडला अचल मालमत्तेच्या विक्रीच्या खात्रीनंतर पंधराव्या दिवशी किंवा त्याआधी अथवा कायद्यातील तरतुदींनुतार अशा विस्तारित कालावधीत दिली जाईल.
6. मालमत्तेच्या तपासणीसाठी किंवा अधिक माहितीसाठी, संभाव्य बोलीदार अधिकृत अधिकाऱ्याशी संपर्क साधू शकतात जसे की **नाव - *शेखर काळे* , संपर्क नं. 9823271111 , ऑफिस L&T फायनान्स लिमिटेड, ऑफिस नंबर 301, 3रा मजला, जेनिथ कॉम्प्लेक्स, सक्कर संकुल जवळ, शिवाजी नगर, पुणे - 411005.आणि संतोष तिवारी, संपर्क क्रमांक 9920490126, L&T फायनान्स लिमिटेड, ऑफिस: 6 वा मजला, वृंदावन बिल्डिंग, प्लॉट नंबर 177, कलिना, CST रोड, मर्सिडीज शोरूम जवळ, सांताक्रूझ (पूर्व), मुंबई - 400 098.** ई-लिलावाच्या कोणत्याही टप्प्यावर, अधिकृत अधिकारी कोणतेही कारण न देता आणि कोणतीही पूर्वसूचना न देता बोली/ऑफर स्वीकारू/नाकारू शकतो/सुधारू शकतो/रद्द करू शकतो किंवा ई-लिलाव पुढे ढकलू शकतो
7. यशस्वी खरेदीदार/बोली लावणार हे लागू कायद्यानुसार सदर मालमत्ता त्याच्या/तिच्या/त्यांच्या नावे कन्वेड/डिलिवर्ड करुन घेण्यासाठी भरणे आवश्यक असलेले कोणतेही वैधानिक थकबाकी. कर, शुल्क, मुद्रांक शुल्क, नोंदणी शुल्क इ. यांचे वहन करतील.
8. कर्जदार/हमीदार, जे सदर थकबाकीकरिता उत्तरदायी आहेत, ते सदर विक्री नोटीस ही अनामत व्याज (सक्तवसुली) अधिनियमांच्या नियम 8(6) खाली वर उल्लेखित जाहीर ई-लिलाव विक्रीच्या आयोजनाबाबत एक नोटीस म्हणून समजतील.
9. कर्जदार (एक/अनेक)/सह-कर्जदार (एक/अनेक)/गॅरेंटर (एक/अनेक)/मॉर्टगेजर (एक/अनेक) ह्यांना इथे कळवण्यात येत आहे की सदर जाहीर ई-लिलावाच्या तारखेआधी वर दिलेली संपूर्ण थकबाकी भरावी, अन्यथा सरफेसी कायदा, 2002 मधील तरतुदींनुसार एल&टी फायनान्स लि. सदर मालमत्ता विकेल.
10. कर्जदार (एक/अनेक)/सह-कर्जदार (एक/अनेक)/गॅरेंटर (एक/अनेक)/मॉर्टगेजर (एक/अनेक)/सामान्य जनता ह्यांना प्रतिबंध करण्यात येत आहे की एल&टी फायनान्स लिमिटेडची पूर्व लेखी संमती मिळाल्याशिवाय सूचनेतील सिक्युअर्ड मालमत्ता विक्री, लीज किंवा इतर प्रकारे हस्तांतरीत करू नये.

**दिनांक:** 31.12.2024
**ठिकाण:** पुणे

स्वाक्षरी/-
**अधिकृत अधिकारी**
करिता एल&टी फायनान्स लिमिटेड

**मालक, मुद्रक, प्रकाशक, संपादक अशोक विठ्ठल सोनवणे** यांनी शितल प्रिंटर्स, भूषणनगर, पोस्ट केडगाव (देवी) तालुका आणि जिल्हा अहमदनगर पिन-४१४००१ (महाराष्ट्र) येथे दैनिक लोकमंथन मुद्रित केले. व ४३१ सोमवार पेठ, सिद्धीविनायक केशर पुणे पिन नंबर ४११०११ महाराष्ट्र येथे प्रकाशित केले. ✻ व्यवस्थापकीय संपादक - रंजन साळवी. RNI : MAHMAR/2011/40983. Email - lokmanthan.pune@gmail.com